पनवेल (प्रतिनिधी) पनवेलला विकासमय करण्याचे काम आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले आहे, असे प्रतिपादन राष्ट्रवादी कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष भिमसेन माळी यांनी मंगळवारी कामोठे व कळंबोली येथे सुरू करण्यात आलेल्या महा ई सेवा केंद्राच्यानिमित्ताने केले.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली कामोठे व कळंबोली येथे जनतेच्या सेवेसाठी महा ई सेवा केंद्र उभारण्यात आले आहेत. या केंद्राचे उदघाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आज करण्यात आले. त्याप्रसंगी भिमसेन माळी बोलत होते.

यावेळी भिमसेन माळी यांनी आपल्या भाषणातून पुढे सांगितले की, पनवेलमध्ये आजपर्यंत इतरांना जेवढी कामे झाली नाहीत त्याच्या अनेक पटीने विकासकामे आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली आहेत. विरोधकांनी ५२ वर्षात केलेली कामे आणि आमदार प्रशांत ठाकूर यांनी अवघ्या पाच वर्षात केलेली कामे याचे गणित मांडले तर विकासकामे करण्यात आमदार प्रशांत ठाकूर यांचे पारडे जड असणार आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांनी शहराचा विकास केलाच त्याचबरोबरीने ग्रामीण भागात रस्ते, पाणी, वीज, समाजमंदिर, अशा विविध पायाभूत सुविधा पुरविण्याचे काम केले आहे असे माळी यांनी सांगून विरोधक टीका करत असतात, त्यांना तेवढेच काम आहे त्याकडे लक्ष देवू नका, आम्ही तुमच्या पाठिशी ठामपणे उभे असून प्रशांतदादांना पुन्हा एकदा आमदार म्हणून निवडून आणण्यासाठी कटीबध्द आहोत, असेही माळी म्हणाले.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी महा ई सेवा केंद्राच्या माध्यमातून नागरिकांनी चांगल्या प्रकारची सेवा करण्याची संधी मिळाली असल्याचे सांगून यापुढेही जनतेच्या सेवेसाठी प्रयत्नशिल राहू, असेही सांगितले.

या कार्यक्रमास तालुका कॉंग्रेसचे कार्याध्यक्ष अरूणशेठ भगत, महिला तालुकाध्यक्षा ॲड.आशा भगत, जिल्हा परिषद पक्षप्रतोद राजेंद्र पाटील, खालापूर कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष नाना म्हात्रे, जिल्हा उपाध्यक्ष सुदाम पाटील, सतिश गायकवाड, ज्येष्ठ नेते एन.सी.घरत, मावळ लोकसभा युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष किशोर चौतमोल, पनवेल विधानसभा अध्यक्ष दशरथ म्हात्रे, तालुकाध्यक्ष अमर पाटील, अल्पसंख्यांक विभागाचे जिल्हाध्यक्ष अमीर सय्यद, कामोठे कॉंग्रेसचे अध्यक्ष गोपीनाथ गोवारी, कळंबोली विभागीय अध्यक्ष बुधाजी ठाकूर, तालुका उपाध्यक्ष वशीर पटेल, सरचिटणीस दिनेश शिरसाठ, महिला विभागीय अध्यक्षा दिक्षा जगताप, रोहिणी साखरकर, माया आहिरे, स्वप्नाली म्हात्रे, ज्योती रायबोले, युवा नेते हॅप्पी सिंग, प्रविण खंडागळे, प्रितम म्हात्रे, उदित नाईक, वीर सिंग, रमेश तुपे, श्रेयश घरत, जोहेब पटेल, सतिश पाटील, निता ससाणे, यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.